# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२४/प्र.क्र.०५/अतिरिक्त परीक्षा/सीईटी/२०२५/२०५७ दिनांक - ०६/०६/२०२५.

# जाहीर सूचना
## बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम-सीईटी-२०२५
## अतिरिक्त सामाईक प्रवेश परीक्षा

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता तंत्रशिक्षण विभागातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम-सीईटी-२०२५ ही ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा दिनांक २९ एप्रिल, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत घेण्यात आलेली असून त्याचा निकाल दिनांक ०४ जून, २०२५ रोजी घोषित करण्यात आलेला आहे.

सदरील परीक्षेस काही उमेदवार सहभागी होऊ न शकल्यामुळे उमेदवार/ पालक/ संस्था यांनी सीईटी कक्षास व्यक्तीशः भेट देवून, ई-मेलद्वारे त्याचप्रमाणे दूरध्वनीद्वारे अतिरिक्त सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याबाबत विनंती केली आहे.

सदरील उमेदवारांचे शैक्षणिक हिताचा विचार करुन शासनाने या कार्यालयास बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता अतिरिक्त सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याची मान्यता दिलेली आहे.

सदरील अतिरिक्त परीक्षेचे वेळापत्रक व इतर माहितीबाबत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या www.mahacet.org संकेतस्थळावर नियमितपणे भेट द्यावी, याची सर्व संबंधित ईच्छुक विद्यार्थी/ पालक/ संस्था यांनी नोद घ्यावी.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई